नि.फौ.के.नं. ०३/२०२१

नि. क्र. ४६

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब**

**नाव** – मालती मारुती जाधव, **वय**– ७४ वर्षे,

**व्यवसाय** – गृहिणी, रा. चाफवली सरोदेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे** –

०१. सन २०२० साली माझ्या घरी माझी मुलगी, तीचा मुलगा, नातु सागर, नातसुन, माझा मुलगा आणि सुन रहायचे. माझे पती मयत होऊन दहा वर्षे झाली. सन २०२० साली काय झाले माझ्या लक्षात नाही. माझ्याकडे पोलिसांनी चौकशी केली नाही. (**सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा का.क. १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आणि फौ.प्र.सं.क. १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पध्दतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.**)

०२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीच्या निधनानंतर माझे व माझ्या पतीचे दागीने माझ्याकडे होते. हे म्हणणे खरे आहे की, एक सोन्याचा चार तोळ्याचा नेकलेस, एक सोन्याची गोफ, तीन तोळ्याचा वाघ नख्याचा पेन्डट, तीन तोळ्याच्या तीन अंगठ्या, एक तोळ्याची बांगडी मी माझ्या मुलीकडे ठेवायला दिली होती.

०३. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी स्वाती हीने ते दागीने सुटकेसमध्ये ठेवुन तीच्या घरात कपाट नसल्याने माझी दुसरी मुलगी वेदीका हीच्याकडे खोलीमध्ये ठेवण्याकरता दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, हे सर्वांना माहीती होते. हे मला माहीती नाही की, दि. १५/०७/२०२० रोजी स्वातीने ज्या सुटकेसमध्ये दागीने ठेवले ती माझ्या आणि वेदीकाच्या समक्ष उघडले असता त्यामध्ये

दागीने व्यवस्थीत होते. (साक्षीदार कथन करतो की, माझ्याकडे चौकशीच झाली नाही.)

०४. साक्षीदाराला प्रश्न विचारला असता साक्षीदाराने मला साक्ष द्यायची नाही असे उत्तर दिले. सबब पुढील सरतपास बंद करण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांनी नाकारला.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.06.22 15:37:31 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – २१/०६/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**